स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

---

संदर्भ : रासेयो/२०२३—२४/९४ दि. १८/०५/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : राज्यस्तरीय रासेयो कार्यक्रम अधिकारी अधिवेशन तथा कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत

महोदय,

राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व कार्यक्रम अधिकारी/जिल्हा/विभाग समन्वयक/कार्यक्रम समन्वयक/संचालक यांचे दिनांक २६ व २७ मे, २०२३ रोजी दोन दिवसीय 'राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी अधिवेशन' मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, मा. केंद्रीय मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत पै. खाशाबा जाधव क्रीडा संकुल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ याठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. सदर रासेयो राज्यस्तरीय अधिवेशनाकरिता महाराष्ट्रातील महाविद्यालयांमधील २००० हून अधिक रासेयो कार्यक्रम अधिकारी व संचालक/पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तरी सदर अधिवेशनाकरिता पुणे शहरातील महाविद्यालयामधुन एकक निहाय सर्व रासेयो कार्यक्रम अधिकारी आणि पुणे ग्रामिण, अहमदनगर आणि नाशिक या जिल्ह्यातील प्रत्येकी महाविद्यालयातील एक कार्यक्रम अधिकारी यांनी उपस्थीत राहणे अनिवार्य आहे. सदर अधिवेशनातील सहभागाकरिता **nss.unipune.ac.in** या संकेत स्थळावर नाव नोंदणी दिनांक २२ मे २०२३ रोजी, सायं. ०५.०० वाजेपर्यंत करणे आवश्यक आहे. नाव नोंदणी केलेल्या कार्यक्रम अधिकारी यांना दिनांक २६ मे, २०२३ रोजी, सकाळी ०९.०० वाजता इनडोअर सभागृह, पै. खाशाबा जाधव क्रीडा संकुल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे याठिकाणी उपस्थित राहण्याविषयी सूचित करावे. तसेच सर्व जिल्हा व विभाग समन्वयक यांनी सदर अधिवेशनास अनिवार्यपणे उपस्थित राहवे. सदर प्रवास खर्च रासेयो नियमित कार्यक्रमातून करावा. कळावे ही, विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : मा. राज्यसंपर्क अधिकार रासेयो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र

महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय सेवा योजना (मंत्रालय कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई- ४०० ००१.
Email- nssmantralaya@gmail.com दूरध्वनीक्र. ०२२- २२६७९५६५

क्र.- रासेयो-२०२२/ प्र.क्र ११३/साशि-७ दिनांक - १६ एप्रिल, २०२३

प्रति,
कार्यक्रम समन्वयक तथा संचालक
सर्व कृषि / अकृषि / संस्कृत / मुक्त / आरोग्य विद्यापीठे,
तंत्रशिक्षण / संचालनालय.

**विषय :- रासेयो सर्व कार्यक्रम अधिकारी यांची राज्यस्तरीय अधिवेशन तथा कार्यशाळा दि. २६ व २७ मे, २०२३ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे उपस्थित राहाण्याबाबत.**

उपरोक्त विषयानुसार राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व कार्यक्रमअधिकारी यांची राज्यस्तरीय अधिवेशन तथा कार्यशाळा दि. २६ व २७ मे, २०२३ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे मा. मंत्री, श्री चंद्रकांत (दादा) पाटील, (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे. सदर अधिवेशनासाठी राज्यातील सर्व विद्यापीठातील कार्यक्रम समन्वयक तथा संचालक यांनी स्वत: उपस्थित रहावे. सदर अधिवेशनास प्रतिनिधींना पाठवू नये, याची सर्वांनी नोद घ्यावी. राज्यातील सर्व महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी यांना सदर अधिवेशनास उपस्थित राहणेबाबतच्या योग्य त्या सूचना सर्व विद्यापीठांनी आपल्या अंतर्गत् येणाऱ्या सर्व महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.

सदर कार्यक्रम रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत करण्यात येत असून या कार्यक्रमासाठी युवा व खेळ मंत्रालय भारत सरकार यांचे मंत्री मा. अनुरागजी ठाकूर, मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

सबब, सर्व महाविद्यालय व सर्व विद्यापीठातील रासेयो कार्यक्रम समन्वयक तथा संचालक, जिल्हा समन्वयक, विभागीय समन्वयक व कार्यक्रम अधिकारी यांनी सदर अधिवेशनास उपस्थित राहाणे अनिवार्य असेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रवास खर्च रासेयो नियमित कार्यक्रमाच्या खर्चातून करावा.

उपस्थित राहाण्यासाठी पुढे दिलेल्या संकेत स्थळावरती नाव नोंदणी करावी.

संकेत स्थळ: nss.unipune.ac.in

Rameshwar
16-5-23

(डॉ. रामेश्वर रा. कोठावळे)
राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन.